देव साईनाथ कुण्या माऊलीचा लाल
बोरावके तुकाराम घाली गुलाबाची शाल
पवित्र गंगा साईंच्या चरणी आली
दासगणू बाबांना लोटांगण घाली॥

माऊली लक्ष्मी करी बाबांची भक्ती
नवविध भक्तीची नाणी तिचिया हाती
देव साईनाथ कुण्या माऊलीचा तान्हा
उपासनी बाबांना अमृताचा पान्हा॥

देव साईनाथ कुण्या माऊलीचे मूल
रामनवमीला शिरडी लक्षदीपात खूलं
साईमाऊली हेचि तीर्थ पावन आमुचे
शकुंतला नमी पद कमल साईंचे॥

॥२॥


बाईजा माऊली भिक्षा घाली नित्य
देव साईनाथांनी नाही सांगितली जात
देव साईनाथ कुण्या माऊलीचा सूत
द्वारकामाईत लावियली पाण्याची ज्योत॥

साईमाऊली डेगीत शिजवीतसे भात
उकळत्या भातात घालीतसे हात
साईमाऊली मंत्र संजीवनी मुखात
अग्निदेव प्रसन्न आले धनीत त्वरित॥

साईमाऊलींनी सापाचा केला नि:पात
भाविक भक्त बुट्टी बाबांना विनवित
द्वारकामाईत दरवेशी घेऊनी वाघ येत
नजरेला नजर देता वाघ मिळाला चैतन्यात॥

देव साईनाथ कुण्या माऊलीचा पूत
विजयादशमीच्या दिनी मालवली ज्योत
एक भक्त आला लोटांगण घालीत
शकुंतलाने पाहिली तयाची मात॥

**– सौ. शकुंतलाबाई गोंदकर**
शिरडी, अहमदनगर.



# साईसाथ

जो जो तुजसी भजतो साई।
तो तो प्रेमाची फुले नवलाई॥

सुखात दुःखात तुम्हीच खेळता।
माझ्या जीवनात आपुलाच वाटा।
प्रत्येकास देवा देसी तूच साथ।
संकटी रक्षाया, लाख तुला हात॥

- **श्री. आशिष हजारे**
बोरीवली, मुंबई.

श्रीकृष्ण : धनंजया, मी दाखविले तुज दिव्य विश्वरूप,
विभुती माझ्या, मत्प्रेमाचा ज्ञान भक्तिदीप
पार्था, भज मज, शरण ये मला, स्वरुपी हो लीन
अनन्यभावे समर्पणाने जोडी आत्मज्ञान
देह क्षेत्र हे लीलाभूमी पांच इंद्रियांची
प्राण मनाची देहबुद्धीची, विषयासक्तीची
तिथे खेळते अजाण देही जीवदशा स्वप्न
जिवाशिवाचे नाते मंगल, नसे मुळी जाण

- **गीता**

बालसाईभक्तांसाठी

- वैखरीताई

# जीवनाचे सारसर्वस्व

बालसाईभक्तांनो, काव्य म्हणजे जीवनाचे सारसर्वस्व आहे. आयुष्यातला तो मधु आहे. आम्हाला आनंद झाला की, आम्ही नाचतो, गातो; यमकात, तालात बोलतो; भावनाविवश झाल्यावर आम्ही अंगाई गातो, प्रेमगीते गातो, विजयगीते म्हणतो, संग्रामगाणीही गातो. आई तालसुरात गाते, तेव्हा बालकही सुखावते. संगीताच्या तालावर, गाण्याच्या शब्दाबरोबर, लयबद्ध हालचालीवर लहान मूलही नाचते. संगीत व गीत याने केवळ मानवच मंत्रमुग्ध होत नाही, तर तालबद्ध स्वरात परमेश्वराचा महिमा गायिल्यावर परमेश्वरही आकर्षित होतो.

बाबांच्या लीला व महिमा यांचे गायन ऐकून साईभक्तही मोहून जातात. बाबांच्याबद्दल प्रेम, भक्ती व कृतज्ञता यांनी त्यांची मने भारावून जातात. त्यांनाही शब्दात व भक्तिगीतात बाबांचे महात्म्य आपणही गुंफावे व गावे असे वाटते. ही नैसर्गिक प्रतिक्रिया आहे व तिचा अर्थ आपण समजू, उमजू शकतो; परंतु भक्तीचा महिमा गाताना आपण काव्यशास्त्र, पद्यरचना, व्याकरण, तालबद्धता, यमकरचना यांचा अभ्यास केला नसेल व कविता लेखनाचे तंत्र हस्तगत केले नसेल, तर आपण आपल्या काव्यरचनेत यशस्वी होणार नाही. त्यामुळे चांगले काव्य करण्याची कला व तंत्र आपण शिकले पाहिजे. त्याचा अभ्यास करुन ते विकसित केले पाहिजे. याची पूर्व तयारी केल्यावाचून कागदावर लेखणी ठेवणे हास्यास्पद तर ठरेलच, पण केविलवाणेही वाटेल. सुरुवातीस आपण अज्ञ असू; परंतु सरावाने थोरांच्या सल्ल्याने व अभ्यासाने आपण लेखक व कवी आपले लेखन सुधारु शकू, दुरुस्त करू शकू व संस्कारितही करु शकू. आपण जे काही वेडेवाकडे लिहिले असेल, त्याचे परिष्करण न करता, ते जसेच्या तसे स्वीकारले व छापले जावे, असा आपण दुराग्रह धरता कामा नये.

''श्री साईलीला''कडे पाठविण्यात येणारे बरेचसे काव्य हे नवशिक्या, होतकरू भक्तांनी लिहिलेले असते व त्यांत सुधारणा करण्याचे परिश्रम त्यांनी घेतलेले नसतात. याबाबत संपादकांशी चर्चा करता मला असे आढळले की, पुष्कळसे लिखाण अगदी अर्धे कच्चे व कसेतरी लिहिलेले असते. अशा लेखक-कवींनी लेखनाबद्दल काळजी घ्यावयास हवी. शक्य झाल्यास वडिलधाऱ्या मंडळींचा सल्ला घेऊन त्यांनी लेखन

करावयास हवे. संपादकांशी चर्चा केल्यास त्यांनीही मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. तरुण लेखक-कवींनी आपले दोष जाणले पाहिजेत व ते सुधारण्याचा प्रयत्न करण्यात कमीपणा वा अपमान मानता कामा नये.

असे परिश्रमपूर्वक व शास्त्रशुद्ध लिखाण आपण लिहू शकलो, तर साईभक्तांच्या इतिहासात एक नवे पान आपण उघडू, एक नवा अध्याय सुरु करु. यासाठी आपण आज एक कृतनिश्चय करु या की आम्ही जे जे लिहू, ते ते विचारपूर्वक, अभ्यासपूर्वक व सच्च्या भक्तीने लिहू व या कलेत प्रावीण्य मिळवू.

—◆—

### शब्द शोध क्र. ५

मागील कोडयाचे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| शं | ख | ना | द |
| क | | रा | |
| र | | य | क्ष |
| | बा | ण | |

## साईनाथ

अेक दोन तीन चार।<br>
साईनाथांचा जयजयकार।<br>
पाच सहा सात आठ।<br>
साईनाथा दिला पाट।<br>
नऊ दहा अकरा बारा।<br>
साईनाथाची आरती करा।<br>
तेरा चौदा पंधरा सोळा।<br>
भक्त सारे झाले गोळा।<br>
सतरा अठरा एकोणीस वीस।<br>
साई माथ्यावर मोराचे पीस।

- सुधा अ. शिवलकर
बंदर रोड, रत्नागिरी.

# साई राम नाम जप प्रभावाने

साई राम नाम जप प्रभावाने सुटला सुखाचा गार वारा
दुःख संकटाचा अंधार संपुनी मनाला लाभला शांतीचा निवारा
चंद्र सूर्याच्या प्रकाश प्रभावाने
साई राम भक्ती फुलली
चंदनाच्या सुगंध परिमलाने
साईनाथ द्वारकामाई पावन झाली
अरे श्रद्धा सबुरीच्या नाथा
सदैव श्रद्धापूर्वक गुरुजी ठेवितो माथा
पुष्प फुलांची माळ गळ्यात
साईनाथ आहे आपल्यात
संकट भूत प्रेत बाधा नष्ट कराया
धावूनी येतो शिरडीवासी साईनाथ राया
धन सौख्य हर्षाचा मिळवाया ठेवा
साईनाथाचा सदैव जप करावा
सबका मालिक एक म्हणणारा साई
समाधीतून बोलण्याची करतो घाई
निरास पावली व्यथा दैना चिंता
साई उदीची महती सांगू सर्वजना आता
बोलू ॐ राम साई साई गुरु दत्ता

- श्री. एस्. एस्. कविलाक्षी गुरूजी
अंबरनाथ (पूर्व), ठाणे.

## साईअष्टक

माझिया जीवनाचे गलबत
हाकतो स्वये श्री साईदत्त॥१॥

कोसळता दुःखाच्या सरी
धावतो वेगे श्री साईहरी॥२॥

बोल बोलते ही जिव्हा
जशी प्रेरणा देसी साईशिवा ।।३।।

घडते हातून जी जी कृती
मागे उभी तिच्या साईशक्ती ।।४।।

लेखणी करी लेखनाचे काम
करा वळविती माझ्या श्री साईराम ।।५।।

अनंत संकटे आवळिता पाश
विघ्ने निवारितो श्री साईगणेश ।।६।।

आग वा भूकंप फुटो जलाशय
रक्षी कशी नच कळे साईमाय ।।७।।

निश्चिंत चालती माझे व्यवहार
सोसण्या समर्थ आहे सर्व साईभार ।।८।।

- सौ. वर्षा दि. आठवले
वरोडा, चंद्रपूर.

—◆—

# साक्षात्-ईश्वर साई

अधर्माचे उठता लोट।
देव अवतरे नर देहात ।।
साई स्वये होती संत।
टाळिती जगाचा अंत ।।१।।

साई स्वये द्वंद्वातीत।
शुद्ध ब्रह्म प्रेमांकित ।।
लाभेवीण करिती प्रीत।
कर्म करुनि कर्मातीत ।।२।।

साई न प्रपंचासक्त।
गुंतला न कोठे हेत ।।

नाही जात ना गणगोत।
वसती जगी नित्य मुक्त॥३॥

साई जन्म-मरणातीत।
सुखा आणि दुःखातीत॥
लाभ-हानीची ना खंत।
लक्ष गुणांनी अंकीत॥४॥

माऊलीच्या समदृष्टीत।
वर्षे करुणा शाश्वत॥
जया नसे आदि-अंत।
असा साई भगवंत॥५॥

- श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.

# श्री साईनाथांचा संदेश

दया, क्षमा, शांती उपदेश
साईनाथा दे संदेश
माता ही तू पिताही तू
त्राता भक्तांचा साई तू
मानवाला दे आदेश
साईनाथा दे संदेश॥१॥

एक जुटीने करुनी काम
नित्य गाळुनिया घाम
जगी उजळाया नाम
आम्हा पामरा दे आदेश
साईनाथा दे संदेश॥२॥

श्रद्धा-सबुरी उपदेश
साईनाथा दे संदेश
द्यावे आम्हा सदा धैर्य

साईनाथा दे संदेश॥३॥

वारू संकटाचे भार
करु राष्ट्राचा उद्धार
राहू सदैव तत्पर
साईनाथा दे संदेश॥४॥

- श्री. दिलीप बा. सावंत
वरची खोपोली, रायगड.

—◆—

# सर्वसाक्षी साई तू

साई तू दीनांचा
साई तू हीनांचा
साई गोरगरीबांचा
साई तू सर्वांचा॥१॥

साई अनाथांचा
साई पतितांचा
साई सकलांचा
कैवारी दीनांचा॥२॥

पिता तू विश्वाचा
धाता तू जगाचा
त्राता तू भक्तांचा
दयाघन थोर॥३॥

भेदभाव दुरी
साई दरबारी
बाळगा अंतरी
श्रद्धा अन् सबुरी॥४॥

भक्तांची माऊली
कृपेची साऊली

असे जळी स्थळी
सर्वसाक्षी देव॥५॥

– श्री. द. रा. तळेकर
कुलाबा, मुंबई.

—◆—

## गोविंदा

आला बाबांचा गोविंदा आला
आला शिरडीत गोविंदा आला॥धृ॥

मानव जातीचा मेळावा जमला
एकतेचा घडा केला
ममता अमृताने भरला
समता धाग्याने बांधला
ठेवी करूणा श्रीफळ
असा शिरडीत गोविंदा आला॥१॥

जाति भेदाचा थर पहिला
दुजा उच्च नीचतेचा ठेला
वरी बंधु भाव गेला
माठ प्रेम धडकेने फुटला
ममतेच्या अमृती न्हाला
असा शिरडीत गोविंदा आला॥२॥

नामाचा गुलाल लावला
भक्ति प्रसाद वाटला
दही भात काला केला
सर्वामुखी घास भरविला
असा दही काला केला
असा शिरडीत गोविंदा आला॥३॥

प्राणि मात्री करा दयेला
संदेश नवा मानवतेला

"सबका मालीक एक" बोला
साई नामी माधव रंगला
असा शिरडीत गोविंदा केला॥४॥

- श्री. माधव पवार
जयराम सदाशिव रोड, ठाणे.

— ◆ —

## शिरडीत कृष्ण आला

शिरडीत कृष्ण आला
समभाव दिव्य भरला॥धृ॥

नामरुप नाही त्याला, ॐ कार साई झाला।
चराचरी साई भरला, चालवीत या देहाला॥१॥

साईवाणी झाली ऐसी, सर्वा हृदयी माझी वस्ती।
लक्ष ठेवू श्वसनावरती, साईनाथ चरणावरती।
संत साधू ते सांगती, तत्व एक सर्वभूती।
नमू तया तत्वाप्रती, अर्थ द्याया जीवनाला॥२॥

- श्री. विलास तु. पडवळ
दादर (पूर्व), मुंबई.

— ◆ —

## साई नाम

साई साई नाम नित्य पुकारले।
मनात माझिया साई अवतरले।
नयनी भरले साई हृदयी वसे मूर्ती।
अन्य देव नाही आम्हा स्फूर्ती देई।
राम, रहिम, ख्रिस्त सारी रुपे तरी एक।
साई उपदेश देती मालिक सबका एक
साई साई नाम नित्य पुकारतो।

मनात माझिया देव जन्म घेतो।
श्रद्धा वस्तुपाठ भक्ति पुस्तकात।
सबुरीचा मंत्र जनात मनात।
नाही धर्म भेद नाही जात-पात।
मानवता एक सर्वांची जमात॥

- श्री. राजेंद्र पां. **गवळी**
सटाणा, नाशिक.

---

# हे साई!

दत्त दिगंबर तू रत्नाकर
तूचि तुकाराम अन् ज्ञानेश्वर
अभंग ओवी तुझाच ठेवा
भक्तांहृदयी वसशी देवा
राम नाही श्याम नाही
ध्यास मनी हा एकच साई
पंढरीत तू उभी विठाई
सकलजनांची प्रेमळ आई
भावभक्तीने मेळा सजला
दिगंबराचा महिमा घुमला
जवळ घेऊनी प्रेमे मजला
गुरुवाणीने पान्हा पाजिला
कर्मपुष्प हे अर्पण केले
ज्ञानभक्तीचे हार गुंफिले
प्रेमाश्रूंनीं चरण भिजविले
सारे जीवन गुरुमय झाले

- श्री. श्रीकांत **सावंत**
दादर (पू.), मुंबई.

# चोहिकडे मज साईच भासे

चोहिकडे मज साईच भासे!
या सृष्टीच्या सारिपटावर तोच खेळतो फासे।।धृ।।

अक्षर अव्यय ब्रह्म सनातन
ब्रह्मांडाच्या अणुरेणूतून
भरले अवघे स्थिर चर व्यापून
केवळ त्यांच्या इच्छामात्रे कुणी रडे वा हसे।।१।।

रवी-चंद्राच्या किरणांमध्ये
सौदामिनीच्या तेजामध्ये
वा अग्नीच्या ज्वालांमध्ये
राहून जीवन देई कुणाला, प्राण कुणाचे नाशे।।२।।

तृण, कुश, वेली, वृक्षामाजी
सळसळणाऱ्या पानांमाजी
लोभस, गोंडस, कलिकांमाजी
फुलाफुलांच्या अन्तरात जो जीवन रसही पोसे।।३।।

विश्वाच्या सुख-दुःखामाजी
शुक हंसादी विहगामाजी
सान थोर वा जीवांमाजी
राहून कोणा तोच हासवी, सोडी कुणी उसासे।।४।।

मानव-देही तोच राहतो
सर्वान्तरीही निवास करतो
ज्ञान, शक्ती, मति, विवेक देतो
सत्संगाने तरती कोणी, मरे कुणी उपहासे।।५।।

- डॉ. विनायक गो. दुर्गे
शिवाजीनगर, नागपूर.

—◆—

# साईमाऊली

कुणी न वाली, इथे कुणाचा, तूच माय माऊली
साई तूच माझी साऊली।।धृ।।

तू पाण्याचे दीप लाविले
तापत्रयातून स्वये तारीले
धुनीमधली उदी तुझी ती गुणकारी ठरली
साई तूच माझी साऊली....

कडू लिंबाला गोड पालवी
चमत्कार हा मनास भुलवी
त्रैलोक्यामधी तव नामाची कीर्ती किती पसरली
साई तूच माझी साऊली....

तव सान्निध्ये, दु:खे हरती
षड्रिपू सारे दूरची जाती
शरण येऊनी तुझाचि झालो मुक्ती देई माऊली
साई तूच माझी साऊली....

- श्री. दादासाहेब आ. कोते
शिर्डी, अहमदनगर.

—◆—

# श्री साईमंत्रांजली

जनांनो! जरी पाहिजे सौख्य, शांती
जपा, "ओम् नमो साईनाथाय" चित्ती
करा कामधंदा जिवासी जपोनी
मुखी मात्र ठेवा सदा साई-वाणी
धरा धीर येता कधीही विपत्ती
जपा, "ओम् नमो साईनाथाय" चित्ती
त्वरे आवरा आपुल्या वासनांना
नका देऊ थारा कधी दुर्जनांना

स्वमातेप्रमाणे भजा नारि जाती
जपा, "ओम् नमो साईनाथाय" चित्ती
खरा धर्म आहे जगी त्याग, सेवा
असा हिंदु, ख्रिस्ती, मुसलमान किंवा
जरी जन्म नाना तरी एक माती
जपा, "ओम् नमो साईनाथाय" चित्ती
सबुरी धरा आणि श्रद्धा मनात
तदा पावतो तो कृपा-साईनाथ
जयाची असे भक्तरक्षार्थ ख्याती
जपा, "ओम् नमो साईनाथाय" चित्ती

**-श्री. मनोहर म. धुमाळ**
गोरेगांव (पू.), मुंबई.

—◆—

# साई गुरु जगाचा

जेव्हा सुखांत होतो पर्याप्त स्वजन आप्ती
परी दैव आज उलटे कोणी नसेचि साथी
स्वार्थात गुंतलेला हा खेळ जीवनाचा
हा दैव दुर्विलास उध्वस्त संस्कृतीचा॥१॥

वाटच्यास आज आली—अवहेलना उपेक्षा
कोणी न मित्र उरला—ना जीवनी सुखाशा
शोधीत हिंडलो मी—ना आसरा जराही
मज चालणेच अखंड—विश्राम ना कुठेही॥२॥

जे जे असेल दैवी—ते भोगणे सुखाने
हा भोग प्राक्तनाचा—टळणार ना कुणाला
दु:खात ही सुखाचा—संतोष मानीतो मी
मज चालणेच आता—ना शांति चित्त धामी॥३॥

जातील दिवस हे ही—लाभेल सौख्य कामी
अशा मनी धरोनी—मार्गस्थ जाहलो मी

सर्वत्र मात्र आहे–नैराश्य दाटलेले
मज चालणेच आता–विश्राम ना कुठेही॥४॥

जो थांबतो पथी तो–तो संपतोच तिथेच
विझतात दीप सारे–अंधार जीवनात
थांबू नको जराही–तू चाल चाल पुढती
–तुज चालणेच आता–विश्राम ना कुठेही॥५॥

आशा जरी खुळी ही–तुज साद मार्गी घाली
थांबू नको जराही–जरी मोह संधी आली
एके दिनी असाच–अवचित योग आला
पांथस्थ एक वदला–जप साई नाममाला॥६॥

श्री साई साई जप तो–मधुशब्द नित्य ओठी
मज भेटला महात्मा–साई अनंत रुपी
मग सौख्य किरण आले–निशिगंध दारी फुलला
साई कृपा प्रसादे–दारी वसंत आला॥७॥

आदित्य रुप योगी–सर्वज्ञ ज्ञानदाता
हातात हात देई–श्री साईनाथ माझा
श्रद्धेत गुंफिला हा–हा गोफ रेशमाचा
भक्ती रसांत रंगे–आनंद पर्वणीचा॥८॥

संसार सिंधू तरण्या–श्री साईनाथ भक्ती
सौभाग्य, सौख्य, शांती–लाभेल नित्य मुक्ती
ही सत्य-सत्य वाणी–मधु गंध कस्तुरीचा
पाठी सदैव आहे–आधार साईजींचा॥९॥

**–श्री. पां. रं. प्रधान**
फलटण.

# नाही तेल परि पाणी पेट घेत

तेल मागुनिया दीप पेटवावे
दिव्य ज्योती मधि रंगुनिया जावे
तिमिर संगे दारिद्र्य घालवावे
हेतू मनीचा बाबांसी फक्त ठावे॥१॥

फुकट मिळते हे तेल रोज साई
म्हणूनी करितो हा फुका रोषणाई
उद्यां येता मागण्या तेल साई
स्पष्ट सांगा त्या तेल मिळत नाही॥२॥

आम्हीं दाते, परि करी तो दिवाळी
नका देऊ त्या तेल कधी काळी
तिमिरी बसण्या येऊ द्या तया पाळी
शिजे कट हा व्यापार-वाणी आळी॥३॥

दुजे दिनी श्री साई फिरत येती
परि तेला त्या मुळीं न कुणी देती
रिक्त पात्रा घेऊनी परत फिरती
परि नव्हती बाबांसी मुळी खंती॥४॥

रात्री येती पाहण्या मौज वाणी
नाही खंती वा खेद मनी मानी
पेटविती घालूनी दिवे पाणी
स्तिमित होती पाहूनी दिव्य करणी॥५॥

प्रकर्षाने ते दिवे पेट घेती
मूढ वाणी भयचकित मनी होती
साईलीला ही येत दिव्य प्रचिती
साई पदि मग सर्वही लीन होती॥६

नाही तेल परि पाणी पेट घेत
लीला लाघव पाहुनी अचंबित
आणि तेव्हा ते खजील मनी होत
निंदकांचे त्या जुळती दोन हात॥७॥

येई प्रचिती ही तिथे सर्वलोका
अंत पावती त्या मनींच्या कुशंका
लीला बाबांच्या पाहूनी अनेका
मनी वाटे हा देव पृथ्वीलोकां॥८॥

- दा. र. दळवी
वाशी, नवी मुंबई.

—◆—

## त्रिलोक सुंदर! साई-फकीर!!

विविध रुपाने नटुनी! थटुनी! फकीर झालासी
त्रिलोक सुंदर! लाघव अपुले कशास लपविसी?॥धृ॥

दिसला जरी तुम्हा बाबा माझ्या
फकीर वेषी दृष्टीला
पालनकर्ता तू विश्वाचा
विश्वनाथजी म्हणविसी॥१॥

गदा त्रिशूल हो त्यजुनी आयुधे
तू चिमटा करी का घेसी?
स्कंधावरती झोळी अडकवूनी
याचक द्वारी का होसी?
जीवनी दाता तूचि जगाचा
भिक्षाटन तरी का करिसी?॥२॥

काशी अयोध्यापुरी द्वारका
त्यागिली तुम्ही का देवा?
भकास माळावरी फुलविला
झकास क्षेत्राचा ठेवा
तू परमेष्ठी ईप्सित देसी
प्रेमळ अपुल्या भक्तांसी॥३॥

-श्री. बाळासाहेब शां. नाडकर्णी
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

—◆—

# दिव्य जीवनाकडे - ९

महाराष्ट्रातील एक ऋषितुल्य प्राध्यापक व संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक प्रा. केशवराव बेलसरे यांचे स्फुटविचार मागील एका लेखात त्रोटक दिले. प्रा. बेलसरे हे एक श्रेष्ठ नाममार्गीय साधक असल्याने त्यांची ज्ञानेश्वरीवरील प्रवचने फार उद्‌बोधक आहेत. श्रीकृष्णाची गीता, त्यावर ज्ञानेश्वरांचे दिव्य भाष्य व त्यावर पुन्हा आधुनिक साधकपंडित श्री. बेलसरे यांचे विवेचन हा एक साधकांच्या दृष्टीने मनोज्ञ त्रिवेणीसंगम आहे. मनाच्या सहाय्यानेच बंध वा मोक्ष प्राप्त होतो, ही भक्तिवाद्याची मनाची चिकित्सा प्रा. बेलसरे यांच्याद्वारे अभ्यासा.

**प्रा. बेलसरे :** ज्ञानेश्वर म्हणतात की, मन हे इंद्रिये व बुद्धी यांना जोडणारा सांधा आहे. ते वायुरुप चंचल आहे. मन बुद्धीबाहेर रहाते. अहंकाराला स्वाधीन ठेवते. इच्छेचे पोषण करते. आशा निर्माण करते. भयाचा पाठपुरावा करते. इंद्रियांना विषयात लोटते. संकल्प करुन सृष्टी उभारते व मोडते. मनोरथाच्या उतरंडी रचते. ते जीवाला सदासर्वदा बहिर्मुख ठेवते, चैन पडू देत नाही. इंद्रियांना वस्तूंच्या मागे पळविते. बुद्धीवर अज्ञानाचे झाकण घालते व अशाश्वतात सुख मिळेल, हा आभास जन्माला घालते.

मन सदा अनेकपणात रमते. ज्ञानमार्गात, योगमार्गात मनाचा हा खेळ बंद पाडतात. भक्तिमार्गात मनाचा ओघ ईश्वराकडे वळविला जातो. ज्ञानमार्ग मनाच्या भ्रमाचा तत्त्वज्ञानाने निरास करतो. बुद्धीचा अंमल मनावर केला जातो. योगात मनाचा निरास केला जातो. भक्तीत मनाद्वारे ईश्वराची प्रचिती आणली जाते.

आपले मन हे असे चंचल पण संयम करता येण्याजोगे असते. मनच आत्म्याला इंद्रियाशी जोडू शकत असल्याने ते दिव्यही आहे. विश्व मनाशी जोडून त्याचा अंश मन आपल्याठायी आणू शकते. मन स्वत:कडे वळविले की ते अद्‌भुत जादू करते. ते विषयांना सोडते. शरीरात येते. वृत्तीच्या पायऱ्या ओलांडते. अखेर निवृत्त होऊन आत्मरुपात स्थिर होते. मनाच्या निरासाबरोबर संसाराचाही निरास होतो. द्वैत नष्ट होते. ईश्वराशी सन्मुख केलेले मन विश्वाला व्यापील एवढे विशाल होते. विश्व हे घर असल्याचा व परमेश्वर अंतर्यामी असल्याचा ते साक्षात्कार देते. याला योग, ज्ञान, भक्ती यांचा आधार लागतो. आत्मसुखाचा लाभ झाला की मन, वाचा, काया यांचे

व्यापार बंद पडतात. मनासह इंद्रियवृत्ती हृदयात विरते. जीव आत्म्याशी तदाकार होतो. यावेळी प्राणक्रियाही मंदावलेल्या असतात. बुद्धी जीवाच्या ठायी विलीन झालेली असते. ही सुखरुप अवस्था, म्हणजेच साम्यावस्था व आत्मसुखाची अवस्था होय! जीव सुखरुप होऊन शिवाच्या शेजारी आपले आसन मांडतो.

ज्ञानेश्वर गीतेवर भाष्य करताना तीन प्रकारच्या भक्तांचे वर्णन करतात. (१) स्थितप्रज्ञ (अध्याय २), ज्ञानीभक्त (अध्याय १२), गुणातीत (अध्याय १४). बुद्धियोगात निष्काम कर्मास व कर्तव्यास महत्त्व असल्याने स्थितप्रज्ञ हा नैष्कर्म्याद्वारे संवित् गाठतो. ज्ञानीभक्त हा निर्वासन होऊन आनंदरूप संवित् गाठतो. गुणातीत हा सूक्ष्म विचाराद्वारे निर्विकार बनतो, निवृत्ती गाठतो, तेथून संवित् पहातो. हे तीनही अनुभव एकच आहेत. श्रीकृष्ण सांगतात की त्यांना ज्ञानीभक्त फार आवडतो; कारण तो परमेश्वराचे अखंड चिंतन (निदिध्यास) करतो. प्रेमाने ओथंबून गेलेला व अखंड प्रभुचिंतन करणारा हा खरा भक्त होय! यात आर्तता, रसमयता, प्रेम हे आपोआप ओसंडते. यासाठी साधकांनी ज्ञानीभक्त होणे योग्य.

योगमार्गातील साधक नाभिचक्र, हृदयचक्र व आज्ञाचक्र ह्या तीन स्थानांना महत्व देतो. कुंडलिनी परावाणीच्या नाभिचक्राकडे नवजीवन निर्माण करते. हृदयाच्या जागी ध्यान हे ध्येयवस्तूकडे आंदोलत रहाते. या ठिकाणी पाळण्यात झोके देत रहाणारी कुंडलिनी ज्योतिरुपात प्रकट होते. आज्ञाचक्राठायी ती साधकाला दिव्यदृष्टी देते. हृदयातील अनाहत नाद पुढे नेतो व आज्ञाचक्राकडून दिव्य प्रकाशातून आनंदात विलीन करतो. बाह्य जग हे भूताकाशात जगते. मनातील सूक्ष्म जग हे चित्ताकाशात जगते. नाभिचक्रापासून चिदाकाश सुरु होते. हृदयात दहराकाश तर कंठावर महदाकाश उमलते. सर्व प्राण्यांना भूताकाश व चित्ताकाश एकच असते. चित्ताकाश हे मनोवासनांचे असल्याने मुळांत विश्वव्यापी असले, तरी देहात कोंडून सूक्ष्मदेह बनते. त्यामुळेच अंतरात स्थल-कालसृष्टी निर्माण होते. चुकीच्या ज्ञानाने मायावी भ्रम निर्माण होतो. चिदाकाशाच्या उच्च जगात भूताकाश व चित्ताकाश ओलांडून जाणे, ही साधनेची खरी प्रक्रिया आहे. उन्मनी अवस्था प्राप्त झाली की, मन विश्वमनाशी तादात्म्य पावते. यासाठी स्वार्थ, वासना ओलांडून दिव्य जीवनाचा पंथ चोखाळणे आवश्यक आहे. मेंदूच्या मूळाशी पिच्युअरी व हायपोथेलॅमस या दोन ग्रंथी आहेत. त्या अंत:स्त्रावी ग्रंथी चेतल्यावर योग्याला नवजीवन मिळते. हेच "सतरावीचे स्तन्य" वा "अमृत" होय! सतराव्या कलेपर्यंत पोहचावयास हवे. मग मन आत वळून सहजसमाधीत शिरते. निरालंब मूळ तत्त्वास बुद्धी चिकटली पाहिजे. मग विश्वमनाच्या कक्षेत शिरता येते. यास देहाचे जीवन मागे टाकावयास हवे. वृत्तीनिरोध हवा. या योगाच्या प्रक्रियेला

भक्तीची जोडही हवी. नाहीतर प्राणनिरोधाबरोबर मनोनिरोध होणार नाही व व्यापक सामाजिक जीवन जगता यावयाचे नाही. शुष्कयोगी नव्हे, तर भक्तयोगी बनावयास हवे आहे.

**वासुदेवानंदसरस्वती (टेंबे महाराज) :** प्राणायामाने मन स्थिर होत नाही, तर प्राण संयमित होतात. यासाठी कासवाने स्वत:ची अंगे आवरावी, तसा विषयातून मन फाटून घेणारा "प्रत्याहार" हवा व "धारणा" ही हवी. धारणेने प्रेमात मन गुंतवावयास हवे. जप व रुपध्यानात मनाच्या वृत्ती गुंतवावयास हव्यात. प्रत्याहाराने मन निर्मन होते. मानसपूजा, नामस्मरण, भक्ती ह्या सगुण उपासना आहेत. चतुर्भुज सुंदर रुप हे ध्यानासाठी योजिलेले आहे. श्री नारायणाच्या धारणेने मन हे प्राणासह स्थिर होते. प्राणजप साधून मनोजय व मनोलय साधल्यावरच चिदाकाशाच्या दिव्य जीवनात प्रवेश होतो.

**नाथपंथाची साधना :** योग, भक्तीचा संगम साधणारा प्रभावी नाथपंथ हा यज्ञ व वेदाची स्थूल उपासना मानीत नाही. ॐ हा सूक्ष्म वेद नाथपंथ मानतो. नाथांनी नाममंत्र प्रणवाच्या रुपात आणला. शब्दातील नाद हा ईश्वरी आहे. स्वरुपात, म्हणजे आत्म्यात लय ही मुक्ती आहे. मनाला विषयातून उलटविणे, श्वासात सोऽहं कुंडलिनी जागरण, षटचक्रभेदन व अनाहतनादश्रवण या मार्गाने नाथपंथी दिव्य जीवनाकडे जातात. गुरुभक्ती व गुरुमंत्र यांचा नाथांवर प्रभाव आहे. नेत्र अधोन्मिलित झालेले, श्वासनिश्वास स्थिरावलेले; अशावेळी निर्वात दीपाप्रमाणे मनोन्मनी अवस्था प्रगट होते, अमनस्क मुद्रा उगवते, प्रत्यग रुपाने आत्मज्योती आविष्कृत होते, असे "योगतारावली"त शंकराचार्य म्हणतात, तसेच गोरक्षही "सिद्धसिद्धांत" पद्धतीत सांगतात. "नाद" व "अमनस्क योग" हे श्रेष्ठ साधना ते मानतात.

शक्तियुक्त शिव हा ब्रह्मांडाधार आहे. गुरुकृपेने नादलय, सहजकुंभक, प्रत्याहार याद्वारे निरुत्थानपद गाठायचे, असे गोरक्षनाथांनी सांगितले आहे. त्या द्वैता द्वैता विलक्षण शिवाच्या आनंदरुप प्रकाशाकडे जाणे, हे दिव्यजीवन.

**- चकोर आजगांवकर**
१४, गिरिसमीप, श्रीनगर, ठाणे-४.

— ◆ —

# श्री साईनाथा

धाव धाव तू झडकरी आता
श्री साईनाथा ॥

तुमच्या चरणी अनन्यभावे
ठेवितो माथा ॥

अनंत दुःखे भरला आहे
जन्म मानवाचा ॥

कोण आम्हांला दाविल तुजविण
मार्गच मुक्तीचा ॥

सद्गुरुराया श्री दत्ताची
तूच खरी प्रतिमा ॥

अवतरलासी शिर्डी धामी
भक्त मुक्त करण्या ॥

याच देही नेत्री जयांनी
पाहियले तुजला ॥

धन्य धन्य ते झाले असतील
येऊनी जन्माला ॥

**- श्री. दिलीप द. जोशी**
कामठी.

—◆—

# चित्र मी काढू कसे ?

चित्र मी काढू कसे-ग
सांगना काढू कसे ? ॥धृ.॥

रात्रंदिन जे चित्र सखये
हृदयी माझ्या खेळते

काढूनिया तेथुनी ते
सांगना रेखू कसे ? ॥१॥

भाव डोळ्यातील त्यांच्या
नयनी माझ्या पाहते
चित्री त्या डोळ्यात परि ते
सांगना दावू कसे ? ॥२॥

क्षेम देता प्रेम त्यांचे
अंगी गे रोमांचते
कुंचले रामावरी त्या
सांगना फिरवू कसे ? ॥३॥

ओठ मिळता ओठी माझ्या
मूक प्रीति बोलते
दिव्य प्रीति-मीलना त्या
सांगना रेखू कसे ? ॥४॥

रुक्मिणी मी पांडुरंगी
एकरुपी नांदते
काढुनी तेथून त्यांना
सांगना साहू कसे ? ॥५॥

**- श्री. नारायण चिपळूणकर गुरुजी**
दादर (प.), मुंबई.

— ◆ —

# साई नाम

साई नामात दंगलो आम्ही
साई ध्यानात रंगलो आम्ही
काय किमया या नामात
शोधू जाता अनुभव अनंत
साई नामी महान शक्ती
ठाव घ्यावा स्मरुनी उक्ती

साई नामी प्रकांड महती
गाऊनी भक्तगण वर्णिती
आम्ही कोठेही असू जगती
साई दयामय मनात वसती
ऐसी अनंत प्रचंड थोरवी
शरण जाऊनिया जाणावी
लेकरांचे त्राते बाबा साईनाथ
जननी परी मायेचा हात
ध्यानी मनी स्वप्नी निरगांठ
साई नामी जपे खूणगांठ

**- श्री. अशोक वि. साळसकर**
कुर्ला (प.), मुंबई.

—◆—

# साई मंदीर

सबुरीचे घर, श्रद्धेचे हे दार
देहाचे हे छत्र, साईचे मंदिर॥धृ.॥

भक्तीची माधुरी, मागातसे द्वारी
ज्ञानाची शिदोरी, द्यावी जन्मभरी॥१॥

पृथ्वीवरी स्वार, साई जादूगार
गोदेच्या किनारी, अवतरे थोर॥२॥

कल्पवृक्ष थोर, मुक्तीचे घर
आंधळ्याला, दृष्टी पांगळ्यास चाल॥३॥

भक्तीची फुलली, फुले रानोमाळ
मुक्यालाही लाभे, मधुर सुस्वर॥४॥

धरणी आकाश, तुझाच प्रकाश

धर्म समभाव, तुझाच संदेश
सकल जगाचा, एकच संसार।।५।।

-श्री. आर. जी. पगारे
नवापूर, धुळे.

—◆—

## नमो साईनाथा

जया आठविता, नमे नम्र माथा
नमो साईनाथा, नमो स्वामीनाथा।।धृ.।।

जया आठविता, पळे व्याप-ताप
जया आठविता, पळे सर्व पाप
मिळे दिव्य शांती, तया आळविता।।१।।

उदे हो उदे, साईजींच्या उदीची
जया लाभली, हो कृपा त्या विधीची
मिळे मोक्ष ज्यांच्या, मुखी साईगाथा।।२।।

वसे अंतरी, नित्य श्रद्धा, सबुरी
तिथे साईराया, व्यथा दूर सारी
कृपावंत व्हावे, प्रभो श्री समर्था।।३।।

-श्री. विजय ल. गुरव
मुंबई.

—◆—

## साईनिवास

रामकृष्ण ज्याचे घरी
साई तेथे वास करी
रामनाम ज्याचे घरी
साई तेथे वास करी

सत्वगुण ज्याचे घरी
साई तेथे वास करी
क्षमा शांती ज्याचे घरी
साई तेथे वास करी

-प्रा. श्री. पी. के. धर्माधिकारी
कराड, सातारा.

—◆—

# साई जीवनाचा राजा

साई जीवनाचा राजा। साई प्राण आहे माझा।
साई विना देव न दुजा। पाहाता त्रिभुवनी॥१॥

साई आनंद-सागर। साई प्रेमाचे आगर।
साई धैर्याचा डोंगर। केव्हा ही डळमळेना॥२॥

साई सत्या लागी साह्य। साई साधकाची माय।
साई काम धेनू गाय। भक्तांसाठी दुभतसे॥३॥

साई भक्तीचे मंडण। साई देहासी दंडण।
साई पापाचे खंडण। नाना परि रचितसे॥४॥

साई वैराग्याचे मूळ। साई परब्रह्म केवळ।
साई मुक्त करी तात्काळ। सोडी गांठी देहाच्या॥५॥

साई घाली ज्ञानार्जन। साई दाखवी निज धन।
साई सौभाग्य देऊन। नांदवी स्वरुपात॥६॥

कन्या काशी साई उपदेशी। तारकमंत्र दिला आम्हासी।
साई, साई अहर्निशी। ध्यान मानसी लावा रे॥७॥

-प्र. गो. कुळकर्णी
अमळनेर, जळगाव.

—◆—

# मज साई हवा

नकोत मजला इमले माड्या
आलीशान त्या नकोत गाड्या
मज साई हवा हो साई हवा
मज साई हवा हो साई हवा॥१॥

नको साज मज शृंगाराचे
नको भाग्य मज अधिकाराचे
मज साई हवा हो साई हवा
मज साई हवा हो साई हवा॥२॥

नको द्रव्यधन अन्यायाचे
नको प्रतिष्ठा मान फुकाचे
मज साई हवा हो साई हवा
मज साई हवा हो साई हवा॥३॥

नकोत पक्वान्ने मज तुमची
बरी भाकरी गरिबाघरची
मज साई हवा हो साई हवा
मज साई हवा हो साई हवा॥४॥

नसे गर्व मज धन सत्तेचा
द्या मज शेला साई भक्तीचा
मज साई हवा हो साई हवा
मज साई हवा हो साई हवा॥५॥

- श्री. मुरलीधर घोलप
चेंबूर, मुंबई.

— ◆ —

# साईनाथ नमोस्तुते

दीनोऽस्मि पतितोऽस्मि च पातकांना शिखामणि॥
नतोऽहं चरणे देव! साईनाथ नमोस्तुते॥१॥

परीसस्य तु संगेन हेमं भवति लोहकः॥
जीवनं कांचनं कर्तुं साईनाथ नमोस्तुते॥२॥

माता त्वंहि दयापूर्णा बालकोऽहं बुभुक्षितः।
मत्क्षुधा शमनं कर्तुं साईनाथ नमोस्तुते॥३॥

सद्‌गुरु साईनाथ! त्वं कल्पवृक्षो विराजसे॥
भवसागरे तु तरणिस्त्वं साईनाथ नमोस्तुते॥४॥

शांतचित्त महाप्राज्ञ साईनाथ दयाघन॥
मायातम विनाशार्थं साईनाथ नमोस्तुते॥५॥

सिद्धानां सिद्धराजस्त्वं अचिंत्यो करुणालयः॥
पाहि मां पाहि मां नाथ! साईनाथ नमोस्तुते॥६॥

ज्ञानर्को ज्ञानदाता च सर्वमंगलकारकः॥
भक्तरक्षकस्त्वं देव, साईनाथ नमोस्तुते॥७॥

सृष्टिकर्ता विरिंचिस्त्वं, पावनो इंदिरापति॥
संहर्ताच महारुद्रः साईनाथ नमोस्तुते॥८॥


सर्वज्ञः साईनाथ! त्वं सर्वेश्वर महाप्रभुः॥
क्षमासर्वापराधार्थं साईनाथ नमोस्तुते॥९॥

भक्ति विमुखो भक्तोऽहं धेनुस्त्व वत्सला सदा॥
कृपास्तन्यं तु देही मां। साईनाथ नमोस्तुते॥१०॥

शोक चिंता विनाशार्थं कृपा कुरु ममोपरि॥
छाया वितर मत्शीर्षे। साईनाथ नमोस्तुते॥११॥

**- पं. श्री. वा. निगुडकर**
**म्हापसा, गोवा**

—◆—



# योगीराज परब्रह्म्

शिरडी साई इथे प्रगटले।
परब्रह्म् हे पहा उमलले।
क्षण काळाते भान हरपले।
विनम्र होता मी पण सरले॥१॥

दुष्ट सुखी हे रुतुनि राही मन।
जड बुद्धीने वाढवी "मी" पण।
हरवी माया मोह देवपण।
व्यर्थ जाई हे मनुष्य जीवन॥२॥

मलीन वासना भ्रांती भोवरा।
जीव आंधळा फिरे गरगरा।
सद्‌गुरु विण जीव होई घाबरा।
कृपावंत मज तुम्ही सावरा॥३॥

शरण असे मी आलो तुजला।
या भोगातून सोडव मजला।
उद्धरी बाबा गोसावीला।
हीच प्रार्थना हीच प्रभुवरा॥४॥

ॐ साईराम साई शरण मन।
साई चरणी हो मम आत्मार्पण॥धृ.॥

- श्री. सुरेश गोसावी
जोगेश्वरी (पू.), मुंबई.

# आस

दिसे आकाशाची शोभा। चंद्र सूर्याची अन् आभा
तशी धरतीची प्रभा। साई चोहीकडे उभा॥१॥

साई पायी धावे मन। साई निर्धनाचे धन
गाता साई गुण गान। होते आनंदित मन॥२॥

पौर्णिमेच्या चंद्रासाठी। होते चांदण्याची दाटी
बाळ गोपाळांच्या भेटी। साई उभा जगजेठी॥३॥

कशी सांगावी सांगाया। प्रभु साईची किमया
करी मन कासावीस राया। अशी नष्ट केली माया॥४॥

नित्य गाईन गाईन। त्यांची गोड गोड गाणी
मग होईल होईल। माझी शुद्ध शुद्ध वाणी॥५॥

नित्य वाहीन वाहीन। शब्द सुमनांच्या माला
सदा पाहीन पाहीन। साई स्वरुपची डोळा॥६॥

माथा ठेवूनी चरणा। मागे सारू अभिमाना
नित्य हृदयी जपूया। साई पाऊलांच्या खुणा॥७॥

– सी. बी. खरे शिवथर, सातारा.

---

# साईने कृपा केली


साईजीनी कृपा केली, मनबुद्धी स्थिरावली
अहंभाव सुटे माझा, चित्तशुद्धी पूर्ण झाली॥

आता मला काही नको, पूर्ण कामना जाहली
कर्माभिमानही गेला, भक्ती फळालागी आली॥
चारी धामही फिरलो, यात्रा सफल होईना
एक शिर्डी वारीविना, खरा आनंद झरेना॥

अंतरंग शुद्ध झाले, साईलीला आकळली
लहानुसूत अनासक्त, प्रज्ञा ऋतभंरा झाली॥

– श्री. वि. म. हटवार रेशीमबाग, नागपूर.

---



# ॐ नमो भगवते श्री साईनाथाय्

साईनाथ गुरु सिद्धसमर्थ
मम जीवन हे करी कृतार्थ
कृपा आपुली सद्गुरुराया असो निरंतर मजवरी सदया ॥१॥

मायेच्या या महासागरी
भवदु:खाच्या अनंत लहरी
आसक्तीचे कराल जलचर
असह्य दु:खे देती निरंतर ॥२॥

काम क्रोध अन् लोभ भयंकर
अहंकार मद मोह नि मत्सर
सवेचि सारे दुर्गुण घेऊनी
देही बैसती विळखे घालूनी ॥३॥

बाबा तुमच्या आधारावीण
भवसागर हा जाणे तरून
असंभव हे जाणूनी श्री हरी
कृपा करा शिरी ठेवा सत्वरी ॥४॥

नाही भक्ती अन् नाही ज्ञान
जरी असे मी वैराग्यावीण
साईनाम हे पतीतपावन
करील सारे तापनिवारण ॥५॥

भवदु:खे या श्रांत होऊनी
आकांक्षा मुक्तीची धरूनी
शरण मी आलो साईनाथा
आश्रय द्या मज दीनानाथा ॥६॥

तुझे सर्वदा ध्यान घडावे
तुझिया चरणी चित्त जडावे
"मी माझे" पण समूळ विरावे
नरजन्माचे सार्थक व्हावे ॥७॥

आशीर्वाद मजला हा द्यावा